## पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

INSPECTOR ... ANTI-CORRUP... MUM...

1. राज्य महाराष्ट्र State  जिल्हा मुंबई District  पोलीस ठाणे ए.सी.बी. Police Station  पहिली खबर क्र. 29 FIR No.  वर्ष 2024 Year  दिनांक 19/3/2024 Date

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. १९८८ सुधारित कलमे Sections 07, 12

(ii) अधिनियम Act ........ 2018 ........ कलमे Sections ........

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार सोमवार Day  तारीख पासून 18/03/2024 रोजी रात्री 22.42 वा. Date from  वेळ Time  तारीख पर्यंत Date to  वेळ Time

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.  तारीख 18/03/2024 Date  वेळ 10:30 वा. Time

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. 1/24 General Diary Reference : Entry No.  तारीख 19/03/2024 Date  वेळ 5:30 वा. Time

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा 40 किमी Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S.  चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name कस्तुरबा पोलिस स्टेशन, बोरीवली (पू.) मुंबई - 66  ठिकाणचे नंबर No. if any  गल्ली Ward  रस्त्याचे नाव Name of road

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place  गाव Village  पोस्ट Post  तालुका Taluka  जिल्हा Dist.  राज्य State

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station  तालुका Taluka  जिल्हा Dist.  राज्य State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name श्री. राजेश यादव  (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री. रामशंकर यादव

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 38 वर्षे  (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय  फोन नं. Phone No. 9833828209

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation दुग्धव्यवसाय

(g) धर्म Religion हिंदू  जात Caste ........ जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address रूम नं. 2, यादव कंपाउंड, ... नवागाव, दहिसर (प.) मुंबई - 68  गल्ली/वार्ड नं. Ward  घर/नाव नं. House Name No.  फोन/से नं. Phone No.  पॅन नं. Pan No.  बोटर्स नं. Card No.

रस्त्याचे नाव Road  जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place  गाव Village  पोस्ट Post  पो. स्टे. P. Stn.

तालुका Taluka  जिल्हा Dist.  राज्य State  सध्याचा पत्ता Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

(1) सुमित महादेव देसाई, वय-49 वर्षे, व्यवसाय - नोकरी (सहा. फौ. ...MHB पो. ठाणे), रा. ठि. ... को. ऑप. हौ. सोसा. फ्लॅट नं. 102, B-31, ... बोरीवली (प.)
(2) विक्रम अब्दुल शेख, वय-39 वर्षे, व्यवसाय - नोकरी, C.P.C-150696) MHB पो. ठाणे, रा. ठि. ... नगर, लाल बहादुर शास्त्री मार्ग, दहीसर (प.)

यातील फिर्यादी श्री. राजेश रामशंकर यादव, वय ३८ वर्षे, यांचा दि. १९/०३/२०२५ रोजी स्वतंत्र कागदावर हस्तलिखित करण्यात आलेला जबाब हाच नमूद गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात यावा.

समक्ष

19/03/2025

(मिता भोसले)
पोलिस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

Rajesh. R. yadav
19/3/25

जबाब दिनांक १९/०३/२०२५

श्री. राजेश रामशंकर यादव, वय ३८ वर्षे, धंदा – दुध डेअरी, रा.ठि. रूम नं–२, पांडे कंपाउंड, एल एम रोड, नवागाव, दहिसर पश्चिम, मुंबई – ४०००६८. मो.नं. ७७३८२६२०११.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे जन्मापासून माझे कुटूंबियासह रहावयास आहे. आमची ' राजेश दुध डेअरी ' नावाची डेअरी आमचे राहते ठिकाणी असुन त्यातुन मिळणाऱ्या उत्पन्नावर आमचे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी दिनांक १५/०३/२०२५ रोजी रात्री ११.३० वाजता माझी सफेद रंगाची वॅगनर मोटार कार क्र. एमएच–४७–बीके–४९७१ चालवत घरी जात होतो. माझी कार फिस्को रेस्टॉरंट, लिंक रोड, दहिसर पश्चिम, मुंबई येथे आली असता एका लाल रंगाच्या स्विफ्ट मोटार कारला धडकली. त्या स्विफ्ट मधील लोकांनी माझेशी वाद केल्याने घाबरुन मी माझी कार सदर ठिकाणी रस्त्याच्या कडेला उभी करुन घरी निघून गेलो.

काही वेळाने माझे मोबाईलवर, मोबाईल क्र.९७३०२८२७२८ वरून कॉल आला. समोरील व्यक्तीने ते पोलीस उप निरीक्षक प्रदिप मरे असल्याचे सांगुन एमएचबी पोलीस स्टेशन येथे माझेविरूध्द अपघाताचा गुन्हा नोंद करण्यात आला असल्याचे सांगितले व माझी कार जप्त करण्यात आली असल्याचे सांगुन पोलीस स्टेशन येथे येण्यास सांगितले. मी घाबरलो असल्याकारणाने पोलीस स्टेशन येथे गेलो नाही. त्यावेळी मी एमएचबी पोलीस स्टेशन येथील माझे ओळखीचे डिटेक्शनचे पोलीस हवालदार देसाई यांना त्यांचे मोबाईल क्र. ९८२१६२५७६० यावर कॉल केला. त्यावेळी देसाई यांनी मला पोलीस स्टेशनला या, तुमच्या विरूध्द गुन्हा दाखल आहे, मरे साहेबां सोबत बोलून केसमध्ये जामीन मिळवून देतो व गाडी देखील सोडवून देतो असे बोलून त्यांनी माझेकडे रु. ३५,०००/– लाचेची मागणी केली. त्यानंतर पोलीस हवालदार देसाई हे मला वारंवार व्हॉटसअॅप व नॉर्मल कॉल करीत होते. त्यापैकी दि. १७/०३/२०२५ रोजी रात्री १०.४२ वाजता आलेला नॉर्मल कॉल मी रेकॉर्ड केलेला आहे. त्यावेळी पोलीस हवालदार देसाई यांनी माझेकडून मला अटक न करण्याकरिता व माझी गाडी सोडविण्याकरिता रू. २५,०००/– पोलीस उप निरीक्षक प्रदिप मरे यांचे व त्यांच्या स्वतःकरिता रू. १०,०००/– इतकी लाचेच्या रकमेची मागणी केली.

परंतू मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. १८/०३/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता अॅन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई या ठिकाणी गेलो. तेथे माझे तक्रारीवर कारवाई करण्याकरीता सहाय्यक पोलीस आयुक्त मानगावे व पोलीस निरिक्षक भोसले मॅडम यांची नेमणूक करण्यात आली. श्रीमती भोसले मॅडम यांनी मला एमएचबी पोलीस स्टेशन येथील पोलीस हवालदार देसाई हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले. परंतू मला मराठी किंवा हिंदी लिहीता येत नसल्याने भोसले मॅडम यांनी माझा अर्ज लॅपटॉपमध्ये मराठित मी सांगितल्याप्रमाणे टाईप करून घेतला. त्याची प्रिंट काढल्यांनतर वाचुन मी त्यावर सही केली. त्यांनतर दोन पंचाना बोलाविण्यात आले. श्रीमती भोसले मॅडम यांनी त्या दोन पंचाशी माझी ओळख करुन दिली. तो तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला असता अर्ज वाचुन दोन पंचांनी व भोसले मॅडम यांनी सही करून सदर तक्रार अर्ज भोसले मॅडम यांनी स्वतःचे ताब्यात ठेवला.

त्यानंतर भोसले मॅडम यांनी माझे तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून त्याकरीता करण्यात येणाऱ्या कारवाईची माहिती दिली. त्यानंतर पडताळणी कारवाईकरीता श्रीमती भोसले मॅडम व श्री. माणगावे साहेब मला व दोन्ही पंचाना अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातील टेक्नीकल रुममध्ये घेवून गेले. तेथे श्रीमती भोसले मॅडम यांचे सांगण्यावरुन मी माझे मोबाईलवरुन लोकसेवक देसाई यांचे मोबाईलवर कॉल केला असता त्यांनी मला एमएचबी पोलीस स्टेशन येथे भेटण्यास बोलावले. नमुद संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे.

त्यानंतर पडताळणी कारवाईकरीता श्रीमती भोसले मॅडम, श्री. माणगावे साहेब, मी, दोन्हीं पंच व पोलीस पथक दोन पोलीस वाहनातुन एमएचबी पोलीस स्टेशन येथे जाण्यास निघालो. दोन्हीं पोलीस वाहने हॉटेल रामदेव, संजय गांधी नॅशनल पार्क समोर, बोरीवली पुर्व, मुंबई येथे थांबविण्यात आली. तेथे पोलीस वाहनात पंचासमोर श्रीमती भोसले मॅडम यांचे सांगण्यावरुन मी माझे मोबाईलवरुन लोकसेवक देसाई यांचे मोबाईलवर कॉल करुन त्यांना लाचेची रक्कम रु. २०,०००/– करण्याची विनंती केली असता त्यांनी तात्काळ होकार देवून मला एमएचबी पोलीस स्टेशन येथे भेटण्यास बोलावले. नमुद संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे.

लोकसेवक देसाई यांनी लगेच लाचेची रक्कम घेवून बोलावले असल्याने श्रीमती भोसले मॅडम यांनी मला सापळापुर्व/सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगून त्याबाबत माहिती दिली. श्रीमती भोसले मॅडम यांनी माझेकडे सापळा कारवाईकरीता आवश्यक रकमेची मागणी केली असता मी त्यांना माझे बचतीतील रु. २०,०००/- रुपये दिले. त्यांनतर श्रीमती भोसले मॅडम, श्री. माणगावे साहेब, मी, दोन्हीं पंच व पोलीस पथक रिक्षाने सापळा कारवाईकरीता रवाना होवून एमएचबी पोलीस स्टेशन येथे आलो. त्यांनतर मी व पंच श्री विशाल खाडे एमएचबी पोलीस स्टेशन येथे तिसऱ्या मजल्यावरील डिटेक्शन रुममध्ये गेलो. तेथे लोकसेवक देसाई व शेंडगे हजर होते. त्यावेळी लोकसेवक देसाई हे मला डिटेक्शन रुमच्या बाहेर घेवून गेले. लोकसेवक देसाई यांनी पंच खाडे यांना रुममध्येच थांबण्यास सांगुन लोकसेवक शेंडगे यांना रुमच्या बाहेर येण्यास सांगितले. त्यानंतर लोकसेवक देसाई यांनी माझेकडे लाचेच्या रकमेची मागणी करुन सदरची रक्कम लोकसेवक शेंडगे यांचेकडे देण्यास सांगितले. त्यावेळी मी माझे पॅटच्या खिशातील लाचेची रक्कम रू. २०,०००/- लोकसेवक शेंडगे यांचेकडे दिली. लोकसेवक शेंडगे यांनी सदर रक्कम स्विकारून ती मोजुन त्यांचे पॅटच्या मागील बाजूच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर मी पंच विशाल खाडे यांना लाचेची रक्कम दिल्याचे सांगितले. काहीवेळात सापळा पथकामधील अंमलदारांनी एमएचबी पोलीस स्टेशन येथे तिसऱ्या मजल्यावरील डिटेक्शन रुममध्ये येवून लोकसेवक देसाई व शेंडगे यास ताब्यात घेतले.

तरी लोकसेवक सुनिल महादेव देसाई, पद – सहायक फौजदार ३२२८१, एमएचबी पोलीस ठाणे, मुंबई यांनी त्यांच्या पदाचा बेकायदेशीरपणे वापर करून, स्वत:च्या गैरफायदयाकरीता माझे विरुध्द नोंद असलेल्या गुन्हयात मदत करण्याकरीता माझेकडे रू. ३५,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअती रू. २०,०००/- रकमेची लाच स्विकारण्याचे मान्य केले व लोकसेवक विक्रम अतुल शेंडगे, पद – पो.शि.क्र. १५-०६९६, , एमएचबी पोलीस ठाणे, मुंबई यांनी लोकसेवक देसाई यांच्या सांगण्यावरून लाचेची रक्कम रू. २०,०००/- स्विकारली व सदर कृत्यास प्रोत्साहन दिले. म्हणून माझी त्यांचेविरोधात कायदेशीर तक्रार आहे.

माझा जबाब मराठित संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

19/3/25

(नित्ता भोसले)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Rajesh. R. yadav
19/3/25

9\. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तत्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

10\. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page. रु. 20,000/- ज्यामध्ये भारतीय चलनातील रु. 500 च्या 40 नोटा.

चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकुण मूल्य ........ —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) रु. 20,000/-

11\. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any. —

12\. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required): Detail write down back blank page.
आतील तक्रार तक्रीख केली व किरणी आतील कॉलम क्र. ०४ मधील आलोसे क्र. १ यांनी फिर्यादी विरुद्ध नोंद असलेल्या गुन्ह्यामध्ये मदत करण्याकरिता व फिर्यादि यांचे पो. ठाणेस जमा असलेली मो. कार परत देण्याकरिता ३५,००० रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती २०,०००/- रक्कमेची लाचेची रक्कम स्वीकारण्याचे मान्य करून सदरची रक्कम ही आलोसे क्र. १ यांच्या सांगण्यावरून आलोसे क्र. २ यांनी स्विकारली व सदर कृत्यास प्रोत्साहन दिले म्हणून आलोसे यांचे विरुद्ध कलम ७, १२ भ्र. प्र. अधि. १९८८ सुधारित कायदा २०१८ प्रमाणे गुन्हा नोंद

13\. **केलेली कार्यवाही** -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ........ निता भोसले पो. निरीक्षक

2\. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण.

........

3\. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला, पोलीस स्टेशन ........ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........

(3) Transferred to P. S. ........

District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली, फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14\. तक्रारदाराची सही व अंगठा 19/3/25

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

19/3/25

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ निता तुकाराम भोसले

पदनाम Rank ........ पोलिस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ........

Posting ला. प्र. वि. मुंबई

Code No. of I. O. ........

15\. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........

1\. Date and time of submitted to the Court.

| प्रत | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
|---|---|---|---|---|
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report